
मोहिनीअक्का दातार
chhaya.datar@gmail.com

# समर्थ राजकारण



समर्थ रामदास स्वामींचा 'दासबोध' हा ग्रंथ अभ्यासला तेव्हा लक्षात आले की, समर्थांनी अथक परिश्रम करुन समाजातील मरगळ, आळस, निष्क्रियता दूर केली. लोकांना कार्यप्रवृत्त करुन उदासीन मनोवृत्तीतून सत्कर्म प्रवृत्त करुन स्वराज्य स्थापनेच्या महान कार्यात समाविष्ट करुन घेतले. महान कार्य हाती घेतले की, माणसे जोडून, त्यांची क्षमता ओळखून सत्कार्यात सहभागी करुन घ्यावे लागले.

अयोग्यः पुरुषो नास्ति, योजकस्तत्र दुर्लभ।।

व्यक्तीतील गुणदोष जाणून घेऊन त्याचा समाजहित, देशहित साधण्यास कसा उपयोग होईल, याचा विचार करुन योग्य व्यक्तीची योजना करतो तो योजक. हा यातील महत्वाचा घटक असतो असा नेता लाभणे फार दुर्लभ असते. शिवाजीराजांची विरक्ती घालवून स्वराज्य स्थापनेच्या कार्यातच जीवनसाफल्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समर्थांच्या झोळीत शिवाजीराजांनी राज्य टाकले होते, त्याचा सांभाळ व विस्तार करण्याचे कार्य त्यांच्याकडे सोपविले.

समर्थ रामदासांचे राजकारण यावर दोन समास आहेत, ते अभ्यासून त्यांचे विचार जाणून घेण्याचा हा प्रयत्न आहे. मनुष्य स्वभावाची त्यांना उत्तम जाण असल्याने राजनीतीत गुणी नेत्याचे अनन्य साधारण महत्व ओळखून त्यांनी लोकनेतेपदी असणाऱ्या व्यक्तीस युक्तीच्या गोष्टी सांगितल्या आहेत. अखंड सावधानता बाळगली नाही, तर कार्यनाश ओढवतो.

दशक -११, समाज ५ : राजकारण : दशक -१२, समास ९

निवडणूक येन केन प्रकारे जिंकणे हा एकच निकष राजनीतीची जाण येण्यास पुरेसा आहे का? भारतात राजनीतीज्ञांची परंपरा असून सर्वांग परिपूर्ण राजनीतीवरील ग्रंथ आहे. कौटिल्लीय अर्थशास्त्र त्याचा अभ्यास करायला हवा.

दशक-११, समास-५ मधील काही ओव्या विचारार्थ घेत आहे.

**मुख्य हरिकथा निरुपण। दुसरे ते राजकारण।**
**तिसरे ते सावधपण। सर्व विषई।।४।।**
**चौथा अत्यंत साक्षेप। फेडावे नाना आक्षेप।**
**अन्याय थोर अथवा अल्प। क्षमा करीत जावे।।५।।**
**जाणावे पराचे अंतर। उदासीनता निरंतर।**
**नीती न्यायासी अंतर। पडोच नेदावे।।६।।**
**दोष देखोनी झाकावे। अवगुण अखंड न बोलावे।**
**दुर्जन सापडोन सोडावे। परोपकार करुनी ।।१०।।**

दुर्जनांना सुद्धा होता होई तो, आपल्या कामात सहभागी करुन घ्यावे. ज्याच्या त्याच्या योग्यते प्रमाणे, गुण-अवगुण ओळखून कामे सोपवावीत. सर्वांचे हित करावे. समाज विघातक कृत्ये करणाऱ्यांचा सुद्धा उपयोग करुन घ्यावा. परस्पर काटा काढण्यासाठी उपयोग होतो. अंतिम ध्येय असावे प्रजाहित.

**करणे असेल अपाये। तरी बोलोन दाखवू नये।**
**परस्परची प्रत्यये। प्रचीतीस आणावा।।१७।।**
**जो बहुतांचे सोसीना। त्यास बहुत लोक मिळेना।**
**अवघेचि सोसिना उरना। महत्व आपुले।।१८।।**
**लोक पारखून सांडावे। राजकारणे अभिमान झाडावे।**
**पुन्हा रुढासी उचलावे। युद्धकर्त्यास ढकलावे।**
**कारबाराचे सांगावे। आंग कैसे।।२३।।**
**पाहता तरी सापडेना। कीर्ती करु तरी राहेना।**
**आले वैभव अभिळासीना। काही केल्या।।२४।।**
**योकाची पाठ राखणे। येकास देखो न सकणे।**
**ऐसी नव्हते की लक्षणे। चातुर्याची।।२५।।**

समास - ५ राजकारण, यांत एकूण २७ ओव्या, त्यातील फक्त दहा निवडल्या आहेत. तरीसुद्धा सर्वांचा आशय यात येणारच आहे. समर्थांच्या काळात इस्लामच्या (म्लेच्छांच्या) सत्तेसाठी हिंदु जनता अक्षरशः भरडली जात होती. लोकांचे जीवित व वित्त सुरक्षित नव्हते. आपल्या धर्मात सांगितलेले चार पुरुषार्थ पैकी ऐहिक जीवन सुखी करण्यासाठी धर्म, अर्थ व काम हे पुरुषार्थ पारतंत्र्यात योग्य मार्गाने साधता येत नव्हते. परकीय शासनकर्त्यांच्या लहरीवर ते अवलंबून होते. आपला राजा सत्ताधारी झाला. तरच स्वतंत्र व सुशासित सत्ता येऊ शकते.

पण स्वतंत्र भारतात, आपले सत्ताधारी असूनही सुराज्य रामराज्य आल्याचे जाणवत नाही. त्यासाठी शास्ता, सामर्थांनी म्हटल्याप्रमाणे आले वैभव अभिळासीना असा असला पाहिजे. प्रश्न आहे हे साध्य गाठायचे कसे? हा निस्पृह व कर्तृत्ववान लोकहितास जपणारी अशी व्यक्ती निवडणूक जिंकून आली तरच हे शक्य होईल. गुजरात व बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी हे दाखवून दिले आहे.

राजकारणावर लिहिणारे समर्थ रामदास हे पहिले संत. पहिले ते हरिकथा निरुपण असले तरी दुसरे ते राजकारण म्हटले असून कोणीही कर्तव्यविन्मुख न राहता सज्जनांनी राजकारण करायला हवे, अलिप्त राहू नये, असे ते सांगतात. महान कार्य करण्यासाठी स्वतः कार्यरत राहून इतर पारखून घेतलेल्या लोकांवर कार्यभार सोपवून कामे करुन घ्यावी लागतात. कार्यकर्त्यांची क्षमता जाणून वृक्षी रुढासी उचलावे। युद्ध कर्त्यास युद्धास उद्युक्त करुन कामे सांगावी लागतात. करुन घ्यावी लागतात. म्हणजे नेत्याने अनेक माणसे जोडून, योग्य व्यक्तीची त्या त्या जागी योजना करावी लागते. कार्यकर्त्यांना राजी राखावे लागते, परांचे अंतर (दुसऱ्याचे मन) जाणावे लागते. नीती व न्यायाची कास सोडून चालत नाही. एकाची पाठराखण करायची आणि दुसऱ्याकडे दुर्लक्ष करायचे ही चातुर्याची लक्षणे नाहीत. समुदाय जमवायचा तर अनेकांचे सोसोवा लागते, मने राखावी लागतात. असे समर्थ सांगतात.

आश्वासने देऊन यापुढे चालणार नाही, हे जनतेने पुढील निवडणुकीत दाखवून द्यायला हवे, शिवाय सज्जनांनी राजकारणापासून अलिप्त राहणे, भारताला घातक ठरु शकते!

समर्थांनी बारा वर्षे देशाटन करुन लोकांची परिस्थिती जाणली होती, आणि जनजीवन सुखी करण्याची मनात तळमळ असल्याने, सखोल विचारांती लोकांना आळस टाकून कार्यप्रवण करणे. त्यांना आवश्यक वाटले. पारतंत्रता जनमानसाला खुपत नव्हती. ती ईश्वरी इच्छा समजून त्या दयनीय परिस्थितीला लोक अगतिकतेने शरण गेले होते. सुलतानी संकटाला सामोरे जाऊन मुक्त होण्यासाठी एकजुटीने लढा देणे गरजेचे होते. समाजाला कुशल नेतृत्वाची गरज होती. समर्थ नुसते हळहळ व्यक्त करत बसले नाहीत. शिवाजीराजांच्या व्यक्तिमत्वात त्यांना उत्तम पुरुषाचे गुण दिसले, त्यांची निःस्वार्थी वृत्ती व अखंड कार्यमग्रता पाहून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन व शक्य ती मदत गुप्तपणाने करण्याचे समर्थांनी मनोमन ठरविले आणि मठातील संघटित शक्तीने स्वराज्यस्थापनेस हातभार लावला.

थोडे विषयांतर करते. शिवाजीराजे वैदिक परंपरेनुसार सिंहासनाधीश्वर छत्रपती झाले. त्यावेळी ते क्षत्रियकुलोत्पन्न आहेत का? याचा शोध घेतला गेला. सूर्यवंशी राजपूत घराण्यातील ते असून त्यांचे पूर्वज राजस्थानातून महाराष्ट्रात इस्लामी सुलतानांच्या चाकरीत दाखल होऊन त्यांची सत्ता बळकट करत होते, त्या जुलमी राज्यांचा विस्तार करत होते. पण शहाजीराजांच्या मनात स्वातंत्र्येच्छा होती. प्रयत्नही करुन पाहिले. शिवाजीराजांनी अनेक वर्षे कावेबाजाशी कावेबाज होऊन यशस्वी लढा दिला. शिवाजीराजांच्या रक्तांत महाराणा प्रतापांच्या वंशाचे रक्त सळसळत होते. निष्प्रभ झालेली स्वातंत्र्येच्छा शिवाजीराजांच्या मनांत कार्यप्रवण झाली. त्यांची माता जिजाऊच्या स्फूर्तीदायक व्यक्तिमत्त्वाने त्यास खतपाणी घालून जोपासले, तेव्हा कुठे अथक परिश्रमांनी स्वप्न सत्यात आले हे ध्यानात ठेवले पाहिजे.

राजाला माणसाच्या स्वभावाची जाण असावी लागते व त्या त्या काळी उपलब्ध मनुष्यबळ असते, तयांचा सदुपयोग करुन घ्यावा लागतो. स्वयंप्रकाशी व्यक्तिमत्वाच्या प्रकाशझोतात कित्येकांचे सद्गुण प्रकाशमान होतात. परमेश्वर त्यांच्यासाठी खास उपयुक्त माणसे जन्माला घालत नाही. दुर्जन प्रथम वन्दे। दुर्जनांना वंदन करुन त्यांच्यातील गुणदोष ओळखून त्यांच्याकरवी कामे करुन घ्यावी लागतात. समर्थ म्हणतात चोर भांडारी करावा। त्याच्या नकळत त्याच्यावर लक्ष ठेवावे. त्याला मात्र वाटले पाहिजे की त्याच्यावर विश्वास ठेवून खजिना सांभाळण्याचे काम दिले आहे.

आता १९ व्या दशकातील ९ वा समास राजकारण त्याची सुरुवात आहे, ज्ञानी आणि उदास। समुदायाचा हव्यास।

तेणे अखंड सावकाश। येकांत सेवाव।।१।।

ज्ञानी असल्याने जनसमुदायाची कठीण परिस्थिती कशामुळे झाली असेल ते कारण कळते आणि त्यावर उपाय सुचतात. त्यासाठी त्याला मनुष्यबळाची गरज लागते. कारण अशी कामे एकट्याची नसतात. त्यापुढे तो ज्ञानी उदास वृत्तीचा असला तरच निःस्वार्थी असल्याने जनहिताची नीती आचरु शकतो. समर्थ त्याला अखंड सावकाश एकांत सेवावा। असा सल्ला देतात कारण ज्ञानी, निस्वार्थी माणसाने त्यावर सखोल विचार करावा लागतो. अनुकूल प्रतिकूल परिणामांचा विचार एकांतात करता येतो. साधक बाधक विचार करुन ठरविलेले मार्ग जर प्रत्यक्षांत आणायचे तर लोकांचा समुदाय जमविण्याचा हव्यास धरावाच लागतो. कामे कार्यवाहीत आणण्यासाठी त्या त्या कामांसांठी योग्य माणसांची निवड करुन त्यांच्याकडून ती ती कामे वेळेवर करुन घ्यावी लागतात. असे करतो तो योजक. सामान्य माणसांकडून ठरलेली कामे करुन घेण्याचे कौशल्य, मानवी स्वभावाच्या अभ्यास, मृदुभाषा, व्यक्ती चुकल्यास तिला सवरुन घेणे, प्रसंगी कठोर शब्दांत त्यांची कानउघडणी करणे, पण पुन्हा तिला सावरुन घेऊन कार्यहानी होणार नाही. याची काळजी घ्यावी लागते.

**अखंड राहता सलगी होते। अतिपरिचये अवज्ञा घडते।**
**या कारणे विश्रांती ते। घेताच नये।।६।।**
**आळसे आळस केला । तरी मग कारभार चि बुडाला।**
**अंतरहेत चुकत गेला। समुदायाचा।।७।।**
**उदंड उपासनेची कामे। लावीत जावी नित्यनेमे।**
**अवकाश कैचा कृत्रिमे। करावयासी।।८।।**

समर्थांनी माणसाच्या स्वभावाचा किती अभ्यास केला, ते दासबोध वाचत असताना वारंवार प्रत्ययास येते म्हणतात ना अतिपरिचयात अवज्ञा सतत गमनादनादरो भवती।

समर्थांनी हेच सांगितले आहे. पण मोठे काम हाती घेतले की अनेकांशी परिचय वाढवून कार्यभार सोपविता येतो. कर्तृत्ववान माणसाचा अतिपरिचयाने अपमान केला जाऊ शकतो. म्हणून राजाने, नेत्याने लोकांशी फार सलगी करु नये आणि हे साधण्यासाठी स्वतः सतत कार्यरत राहून आदर्श निर्माण करावा लागतो. कोणाला आळसात वेळ घालविता येऊ नये म्हणून सतत कामांत गुंतवून ठेवावे.

रामदासांनी मठस्थापना करुन महतांच्या हाती त्या त्या मठाचा कारभार सोपपिला आणि लोकमान्य टिळकांनी केलेले समाजागृतीचे काम सतराव्या शतकात समर्थांनी केले. तीर्थयात्रेच्या मिषाने केलेले भारत भ्रमण त्यांना प्रेरक ठरले आणि त्यांनी लोकांना कार्यप्रवण करण्यासाठी आयुष्य वेचले. शिवाजीराजे आणि समर्थांची भेट झाली. शिवाजीराजामध्ये समर्थांना नेतृत्वाचे गुण दिसून आल्याने गुप्त रीतीने समर्थांनी शक्य ते सहकार्य करुन त्यांना प्रोत्साहन दिले. याची देही याचि डोळा त्यांना आनंदवनभुवन लाभल`. समर्थ पुढे म्हणतात

**चोर भांडारी करावा। घसरताच सांभाळावा।**
**गोवा मूर्खपणाचा काढावा। हळू हळू।।९।।**
**या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी।**
**राजकारणे मंडळ वेष्टी। चहूकडे।।१०।।**
**नष्टासी नष्ट योजावे। वाचाळासी वाचाळ आणावे।**
**आपणावरी विकल्पाचे गोवे। पडोच नेदि।।११।।**

स्वराज्य सुराज्य व्हावे यासाठी राज्यकर्त्यांनी राजकारणाच्या खेळी खेळायच्या असतात. पण सध्या राजकारणांत स्वार्थकारण इतके एकरुप झाले आहे की ते लोकाभिमुख, जनहितैषी विचार राजकारणातून लुप्तप्राय झाले आहेत. राजकारण्याच्या मनावर भ्रष्टासुराचा प्रभाव दिसतो. एक दिवसही असा जात नाही की देशविघातक प्रकरणे वर्तमानपत्रे आणि दूरदर्शनवर उघडकीस येत नाहीत. सामान्यांनी हे सारे वाचून पाहून ऐकून हळहळायचे आणि सत्ताधाऱ्यांनी त्यावर पांघरुण घालून लपविण्याचा प्रयत्न करुन निर्दोष म्हणवून घ्यायचे. गोरगरिबांच्या नावाने नवीन नवीन योजना आखून आश्वासने देत राहायची आणि त्यासाठी निश्चित केलेल । द्रव्यनिधी, गळती होता होता गरजूंपर्यंत १५-२० टक्के इतका पोहोचू द्यायचा. शिवाय ही गुपिते उघड झाली तरी निःशंकपणे कोर्टात सिद्ध होण्यास अतिशय विलंब लागत असल्याने लोक विसरुनही जातात, हा सत्ताधाऱ्यांचा व लोकांचा आजवरचा (गेल्या ६५ वर्षांचा) अनुभव आहे. हतबलतेने सारे पहायचे दुसरे करणार तरी काय? असे वाटू लागते.

समर्थांच्या राजकारणांत नेता सद्‌गुणी निस्पृह, जनहितदक्ष सतत कार्यरत असणारा, मानवाच्या मर्यादा जाणणारा असायला हवा. त्यांच्या सुदैवाने त्यांच्या कालखंडात शिवरायांनी सुराज्य स्थापले, त्यामुळे समर्थांना सुशासन आल्याने समाधान वाटते.

समर्थांनी चोराला भांडारी करुन त्याच्याकडे सोपविलेले काम करण्यात त्याने गडबड केली तर त्याला सांभाळून घेऊन हळू हळू सुधारण्याची संधी द्यावी. कारण चोराच्या वाटा चोराला माहित असतात. जबाबदारी अंगावर टाकली व लक्ष ठेवले तर कालांतराने तो दुष्कर्माचा त्याग करेल. ही राजनीती नवीन नाही. कुशल राजकारणी सर्व लोकांना आपल्या कार्याकडे आकर्षित करुन सन्मानाने जगण्याची संधी देत राजकारण साधत असतो. शिवाय दुष्टाची योजना केली की स्वतःला नामानिराळे राहून परस्पर काट्याने काटा काढता येतो. कार्य गतिमान होते.

केल्याने होत आहे रे आधि केलची पाहिजे

कामात अपयश आले तर अशी भीती बाळगली, तर काम थांबते, दुर्जन प्रथम वन्दे। असे केल्याने अनेकांना आपल्या राष्ट्रोन्नतीच्या कार्यात सहभागी करुन घेता येते.

**कोणी येक काम करिता होते। न करिता ते मागे पडते।**
**या कारणे ढिलेपण ते। असोचि नये ।।१५।।**
**म्हणजेच केल्याने होत आहे रे। आधि केलीचे पाहिजे।**

थोडक्यात कामे लांबणीवर टाकू नका. कामाला लागा म्हणजे ते होईल.

**मुख्य सूत्र हाती घ्यावे। कारणे ते लोकांकरवी करवावे।**
**कित्येक खलक उगवावे। राजकारणामध्ये।१८।।**

लोकांचा पुढारी असेल त्याच्याशीच मैत्री जोडावी. धूर्त लोकांकरवी कित्येक कामे यशस्वी होतात. पण कामाचे मुख्य सूत्र मात्र नेत्याने आपल्या हाती ठेवावे. युद्ध स्थल आपल्याला अनुकूल त्या जागी करण्यासाठी आपल्या धूर्त मध्यस्थाकरवी शिवरायांनी अफजलखानास जावळीच्या खोऱ्यात येण्यास नम्रपणे राजी केले. शिवाजी राजे आपल्याशी युद्ध छेडण्यास घाबरतात, पण आपल्याशी संधी करण्यास उत्सुक असल्याचे पटवून दिल्याने अफजलखान गाफील राहिला, आणि त्याच्या कपटाला त्यांनी वाघनखांनी उत्तर दिले. हे आपण जाणतो.

**ग्रामण्य वर्मी सापडावे। रागडून पीठाचि करावे।**
**करुनि मागुती सावरावे। बुडवू नये।।२०।।**
**खळ दुर्जनासि भ्याले। राजकारण नाही राखिले।**
**तेणे अवघे प्रगट झाले। बरे वाईट।।२१।।**

गावकरी एकेरीवर आले तर त्यांच्यातील वैमनस्य संपूर्णपणे, न्यायाने नाहीसे करावे, पण नंतर त्यांना सावरुन घ्यावे. कायमचे तोडून टाकू नये. दुष्ट लोकांना भिऊन चालणार नाही. राजकारण (लोकहिताचे) साधताना लोक कायमचे तोडून चालत नाही. शक्यतो सर्वांना आंजारुन गोंजारुन राज्याची कामे करवून घ्यावी लागतात. दुष्ट दुर्जनांनवर वचक ठेवावा लागतो आणि त्यांच्या करवी योग्य ती कामे करवून काम चांगले झाले तर कौतुक करुन आणि चुकले तर त्याची जाणीव कडक शब्दांत करुन द्यावी लागते. त्यासाठी सत्ताधाऱ्याला स्वार्थत्याग करावा लागतो. कारण लोककल्याण साधायचे असते. राजा असा असावा -

**गनिमांच्या देखता फौजा। रणशूरांच्या फुर्फुरती भुजा।**
**ऐसा पाहिजे की राजा। कैपक्षी परमार्थी।।२५।।**

लोकशाहीत सत्ताधारी युद्धभूमीवर येत नाहीत, त्यांना सैनिक व सैनिकी अधिकारी यांची मने कळत नाहीत. तरीही युद्ध चालू करण्याची वा थांबविण्याची आज्ञा करणे त्यांच्या हाती असते.

**तयास देखता दुर्जन धाके। बैसवी प्रचीतीचे तडाखे।**
**बंड पाषांडाचे वाखे। सहजचि होती।।२६।।**
**ही धूर्तपणाची कामे। राजकारण करावे नेमे।**
**ढिलेपणाच्या संभ्रमे। जाऊ नये ।।२७।।**
**जैशास तैसे जेव्हा भेटे।तेव्हा मजलसी बरी थाटे।**
**इतुके होते परी धणी कोठे।दृष्टीस न पडे।।३१।।**

दुष्कर्म करणाऱ्याला सत्तास्थानी असलेल्यांचा धाक वाढायला हवा. यथापराध दंड होणारच अशा अनुभवाची प्रचीती लगेच यायला हवी. तरच गुन्हेगारी कमी होईल. राजकारणपटू त्यांत ढिलाई करत नाहीत. विस्तवाने हात भाजतो. अशी प्रचीती आली की विस्तवापासून आपोआप लोक दूर राहतात. जशास तसा भेटला की राजकारणांत रंग भरतो. पण मुख्य सूत्रधार कोण, ते उघड होत नाही.

शिवाजी राजांनी लोकहिताला प्राधान्य दिले असल्याने ते यशकीर्तीमान झाले. त्यांचे यश स्वार्थाने झोकोळले नव्हते. सध्या राजकारणाच्या चाली स्वार्थ साधण्यासाठी असल्याने त्यांना राजकारणी कसे म्हणता येईल? भ्रष्टाचाराची पाळेमुळे राज (नव्हे स्वार्थ) कारणांत रुजली असल्याने गुन्हेगारी मन उद्‌विग्न होते. न्यायदंडाचा धाक सत्ताधीशांनाही हवा! आपली न्यायालये हे करण्यास असमर्थ ठरत आहेत. एक ना एक दिवस लोकांनी कायदा हातात घेतला, अराजक माजले तर त्यास जबाबदार कोण?

सद्‌गुणी कर्तबगार, निरभिलाशी, लोकांशी आपुलकीने वागणारा, लोकहितास हानी पोहोचविणाऱ्याशी न्यायनिष्ठुर, शक्यतोवर वेगवेगळ्या स्वभावाच्या व क्षमतेच्या लोकांकडून देशहिताची कामे करुन घेणारा कर्तव्यकठोर मितभाषी दूरदृष्टीचा नेतृत्वगुण असलेला... असा पुरुषोत्तम शतकात एक लाभणे सुद्धा दुर्मीळ पण सद्‌गुणी सद्‌विचारी वरीलपैकी काही गुणांनी युक्त निस्पृह माणसे एकत्रितपणे विचार करुन देशहित साधू शकतात. आत्मविश्वास असावा, पण आत्मप्रौढी नसलेली वेगवेगळ्या गुणांनी युक्त माणसे एकत्र आली, तर अशक्य काय आहे.?

**दशक-१८ समास-६ (उत्तम पुरुष निरुपण)**
**नाना वस्त्रे नाना भूषणे। येणे शरीर शृंगारणे।**
**विवेके विचारे राजकारणे। अंतर शृंगारिजे।।१।।**
**शरीर सुंदर सतेज। वस्त्रे भूषणे केले सज्ज।**
**अंतरी नसता चातुर्यबीज। कदापि शोभा न पवे।।२।।**

शिवाजीराजांनी अफजलखानासारख्या कपटी शत्रूचा नाश केला, तेव्हा समर्थ रामदास स्वामींना त्यांच्या यशस्वी वाटचालीचा सार्थ अभिमान वाटला.

**म्लेच्छ दुर्जन उदंड। बहुता दिसांचे माजले बंड।**
**या कारणे अखंड। सावधान असावे।।१२।।**
**येश कीर्ती प्रताप महिमा। उत्तम गुणांची नाही सीमा।**
**नाही दुसरी उपमा। देणे ईश्वराचे।।१६।।**

म्लेच्छांच्या राज्यात प्रजा भरडली जात होती. समर्थांना हे पाहवत नव्हते. ही दैन्यवाणी स्थिती पालटावी, यासाठी सामान्य जनांना बलोपासना व प्रयत्नशीलता यांचे महत्व पटवून स्वराज्य कार्यास लोकांना प्रवृत्त करण्याचे काम केले. समर्थ म्हणतात उत्तम गुणांची नाही सीमा। मग योग्य उपमा कशी सापडणार? देणे ईश्वराचे एवढेच म्हणता येईल.

**धर्म स्थापनेचे तर। ते ईश्वराचे अवतार।**
**जाले आहेत पुढे होणार। देणे ईश्वराचे।।२०।।**
**उत्तम गुणांचा ग्राहिक। तर्क तीक्ष्ण विवेक।**
**धर्मवासना पुण्यश्लोक। देणे ईश्वराचे।।२१।।**

उत्तम पुरुष निरुपण शिवाजी महाराजांचे जणू गुणवर्णन करण्यासाठीच हा समास-

सत्ता, पैसा, यश हे सारे देणे ईश्वराचे हे मनात ठेवले तर अहंकार आत्मप्रौढी दुरभिमान या पासून दूर राहता येते. दुसऱ्यातले गुण टिपायचे, दोष झाकायचे विश्वास टाकायचा पण सजग रहायचे व शक्यतो कार्यप्रवृत्त करुन योग्य ते प्रमाणे कामे करवून घ्यायची कधी चूक केल्याने फटकारावे लागले तरी पुन्हा समजूत काढून कार्य सोपवायचे, दुजाभाव ठेवायचा नाही, स्वतः न गुरफटता दुसऱ्याच्या करवी कानउघडणी करुन स्वतः नामानिराळे रहायचे. भेदभाव करायचा नाही. दुर्जनांवर सुद्धा उपकार करुन कार्यानुकूल करुन घ्यायचे, उगाच वाद वाढवायचा नाही, इत्यादी सूचना लोकसंग्रह करण्यासाठी आवश्यक असतात.

पुष्कळांचे पुष्कळ सोसावे लागते, त्याशिवाय सफल नेतृत्व करुन यशाच्या धनी होता येत नाही. पण सर्वांचे सर्व खपवून घेतले तरी त्याचा मान राहत नाही. त्यासाठी योग्य अंतर राखूनही आपलेपणा राखावा ल ागतो, असे समर्थ सांगता. नेटके व्यवस्थापन करताना सुद्धा अधिकारी वर्गाला समर्थांचा सल्ला उपयोगी ठरेल, यात शंका नाही, व्यवस्थापन कौशल्य नेतृत्व करणाऱ्यांत हवेच.

दोष दिसले तरी शक्यतो त्यावर पांघरुण घालावे. पण दोष लक्षात आलेत हे त्याला तर कळावे, पण षट्‌कर्णी होऊ देऊ नये. त्याची अवहेलना केली नसल्याने तो कृतज्ञ राहील.

रामदासस्वामींनी भारतभर मठस्थापन करुन महंतांना त्याचे नेतृत्व दिले. लोकजागृतीचे काम राजकारणाऱ्या दृष्टीने खूप महत्वाचे असते. ११ मारुतींची स्थापना करुन बलसंवर्धनास प्रोत्साहन दिले. दासबोध अभ्यासल्याने आत्मोन्नती व व्यवहारज्ञान लाभते. हा ग्रंथ उतार वयांत वाचण्यापेक्षा तरुणांनी तो अभ्यासला पाहिजे. आचरला पाहिजे असे मला सतत वाटते. मॅनेजमेंटचा कोर्स करणाऱ्यांना भगवद्‌गीतेशी परिचय करुन घ्यावा लागतो. दासबोध ही उपयुक्त ठरेल.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायनिष्ठुर आणि प्रजावत्सल धोरणाने धर्मसंस्थापना, म्हणजे न्यायाचे राज्य आले, हे ईश्वराचे देणे वाटल्याने पुण्यश्लोकांच्या नृपाबळीत बसण्यायोग्य असे महाराजांचे वर्तन होते. गुणग्राहक एकमेकांना जाणून होते.

शक्तीने मिळते राज्ये।युक्तीने यत्न होतसे।
शक्ति युक्ती जये ठायी। तेथे श्रीमंत धावती।।

एकांतात विचारपूर्वक शक्ति-.युक्तिचा योग्य उपयोग करुन राज्य मिळविता येते. नुसती शक्ती व नुसती युक्ती, कार्यभाग साधण्यास पुरेशी नाही. अपुरे मनुष्यबळ, अपुरी साधन संपत्ती असली तरी हताश न होता. यशस्वी होता येते हे शिवाजी महाराजांनी करुन दाखविले. स्वतंत्र सिंहासन निर्माण केले, त्यांची थोरवी वर्णन करणारी समर्थवाणी वाचताना वाचक थकत नाही.

घालून अकलेचा पवाड। व्हावे ब्रह्मांडाहून जाड।
तेथे कैचे आणिले द्वाड। करंटपण।।
कष्टेवीण फळ नाही। कष्टे वीण राज्य नाही।
केल्यावीण होत नाही। साध्य जनी।।

नेत्याने विचारपूर्वक परिस्थितीचा आढावा घेऊन योग्य ती उपाय योजना करावी. आपल्या जवळील मनुष्यबळ, आर्थिक बळ, शस्त्रास्त्रबळ एकत्रिपणे लक्षांत घेऊन योजना आखावी व कष्टपूर्वक ती सफल करुन दाखवावी.

भारतात लोककल्याणकारी योजना आखल्या जातात, पण कार्यवाहीत आणण्यासाठी सुयोग्य व्यक्तीची नेमणूक करणे गरजेचे असते, इतकेच नही तर त्या द्रव्यनिधीला गळती लागते ती रोखणे, दोषी व्यक्तीला शिक्षा करणे (याकडे मात्र दुर्लक्ष केले) तर परिणामी भ्रष्टाचार पोसला जातो. संबंधित बरेच जण त्यांत सामील असेल, तर तो उघडकीला येत नाही, मग शिक्षा होणे तर दूरच आर्थिक गुन्हेगारी वाढत जाते, जणू तिला अभय मिळते. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की सत्ताधाऱ्यांना जाणवली तरीही ते सुद्धा ती रोखू शकते नाही!! सत्ताधारी हतबलता प्रगट करतात, मग सामान्य माणूस अगतिकतेने जे जे होईल ते ते पहावे म्हणत स्वस्थ बसतो. हताश होतो.

उत्कट भव्य तेचि घ्यावे। मळमळीत अवघे टाकावे।
निस्पृहपणे विख्यात व्हावे। भूमंडळी।।
निस्पृह नेता मिळेपर्यंत...

हे कार - सज्जनांनो, एकत्र या, एकत्रितपणे विचार करा व मार्ग शोधा!!!

■■■